# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. २४ फेब्रुवारी, २०२१**

**(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)**

**जळगाव दि.२४ (    ):** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पहिल्या टप्प्यात ६८ हजार ५३१ विद्यार्थ्यांनी ५ लाख ६८ हजार ७६९ विषयांच्या परीक्षा यशस्वीपणे दिल्या. ५ जानेवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत ऑनलाईन झालेल्या या परीक्षेत ९० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाकडून ऑनलाईन परीक्षा घेतल्या जात आहेत. गतवर्षी अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन झाल्यानंतर आता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पहिल्या टप्प्यात व्दितीय व तृतीय वर्ष (पदवीस्तर), व्यवस्थापन पदवी, पदव्युत्तर सर्व विषय, अभियांत्रिकी व फार्मसी तृतीय व चतुर्थ वर्ष (सत्र ५ ते ८) या परीक्षांचा अंतर्भाव होता. ५ जानेवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत विविध विषयांच्या ५ लाख ६८ हजार ७६९ विषयांच्या झालेली ही परीक्षा ६८ हजार ५३१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने दिली. या झालेल्या परीक्षांमध्ये ज्या विषयांना प्रात्यक्षिक परीक्षा नाहीत त्यांचे निकाल जाहिर करण्याची प्रक्रिया देखील सुरु झाली आहे. या सर्व परीक्षांचे आयोजन विद्यापीठाने स्वत: केले. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या परीक्षांसाठी परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, सर्व अधिकार मंडळे, विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक आणि सर्व आयटी को-ऑर्डीनेटर यांच्या सहकार्यामुळे या परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या.

दरम्यान शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील दुसऱ्या टप्प्यात पदवी व पदविकास्तरावरील प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान, प्रथम वर्ष समाज कार्य, पदवीस्तरावरील व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम, डी.पी.ए., बी.ए.एम.सी.जे., बी.पी.ई., बी.व्होक या अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच विधी अभ्यासक्रमाच्या एल.एल.बी. आणि एल.एल.एम.च्या सत्र एक वगळता इतर परीक्षा २ मार्च पासून घेतल्या जाणार असून या सर्व परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर या परीक्षांचे वेळापत्रक जाहिर करण्यात आले आहे. तिसऱ्या टप्प्यात पदव्युत्तर प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या परीक्षा २५ मे पासून घेतल्या जाणार आहेत अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

----------------------------

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२४ (     ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित जळगाव जिल्हयातील महाविद्यालयांचे नियमित वर्ग ६ मार्च पर्यंत स्थगित करण्यात आले असून ऑनलाईन वर्ग सुरु ठेवले जाणार आहेत. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत ई माहिती तयार करणे, परीक्षांचे व तत्सम कामे करण्यासाठी महाविद्यालयात उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर परिपत्रक प्रसिध्द केले असून त्यामध्ये म्हटले आहे की, १५ फेब्रुवारी पासून महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली होती. त्याप्रमाणे ५० टक्के विद्यार्थ्यांची रोटेशन पध्दतीने उपस्थिती ठेवून कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांची अंमलबजावणी करीत महाविद्यालये / विद्यापीठ प्रशाळा सुरु झाल्या होत्या. तथापि, कोविड रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने जळगाव जिल्हयातील महाविद्यालये बंद ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाल्यामुळे नियमित महाविद्यालये सुरु करण्याची कार्यवाही ६ मार्च पर्यंत स्थगित करण्यात आली आहे. या कालावधीत घेण्यात येणाऱ्या सर्व पूर्वनियोजित ऑनलाईन परीक्षा सुरु ठेवाव्यात असेही या परिपत्रकात विद्यापीठाने महाविद्यालयांना कळविले आहे.

---

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी